# सांस्कृतिक विभाग

## डॉ. राजाराम वाडते, चेअरमन

■ सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षात विद्यापीठाच्या वतीने घेण्यात आलेला जिल्हास्तरीय युवा महोत्सव प्रा संभाजीराव कदम महाविद्यालय, देऊर येथे २२/०९/२०१९ रोजी संपन्न झाला. या युवा महोत्सवात मराठी,हिंदी,इंग्रजी, वक्तृत्व, पथनाट्य,लोकनृत्य, एकांकिका, मूकनाट्य, वादविवाद,

प्रश्नमंजुषा, समूहगीत, लघुनाटिका, अशा विविध स्पर्धामध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. यामध्ये मराठी वक्तृत्व-द्वितीय, वादविवाद-प्रथम नकला-द्वितीय व प्रश्नमंजुषा-चतुर्थ असे क्रमांक पटकाविले. २६/०९/२०१९ ते २८/०९/२०१९ या काळात मुधोजी महाविद्यालय, फलटण येथे आयोजित मध्यवर्ती युवा महोत्सवात विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन यश संपादन केले. ■ या वर्षी दिनांक १३/०२/२०२० रोजी महाविद्यालयात 'भारतीय संस्कृती दर्शन' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. त्यामध्ये वैयक्तिक सादरीकरण व सांघिक सादरीकरण करण्यात आले. यामध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त भाग घेऊन भारतीय संस्कृतीचे दर्शन घडविले. महाविद्यालयात प्रत्येक वर्षी विविध महापुरुषांच्या जयंती व पुण्यतिथी साजऱ्या करण्यात येतात.



## सांस्कृतिक विभाग आयोजित संस्कृती दर्शन व कलाविष्कार

